# “आपलं पाणी” प्रकल्प

## यशोगाथा - कोठे बु. ता.संगमनेर जि.अहमदनगर

### पुढाकार तुमचा,सहभाग शासनाचा/लोकसहभागातून गावाचा सर्वांगीण विकास/ शुध्द पिण्याचे पाणी,स्वच्छता व आरोग्याची हमी.

लोकसहभागातून सर्वांगीण विकसीत झालेले असे हे गांव नाशिक पुणे राजमार्गावर मौजे घारगांव चे पश्चिमेस ८ किमी अंतरावर मुळा नदीच्या दक्षिंण तीरावर उंचच उंच डोंगराच्या कुशीत वसलेले आहे. गावठाण व एकूण ११ वाडया वस्त्यांची लोकसंख्या २११० आहे. गावाचे एकूण भौगोलिक क्षेत्र ८६४.३८ हेक्टर असून त्यापैकी ३४४.११ हेक्टर वनक्षेत्र आहे. उर्वरीत क्षेत्र हे वहिती खाली असून त्यामध्ये प्रामुख्याने गहू बाजरी व भाजीपाला इ. पिके घेतली जातात. उन्हाळी हंगामात प्रामुख्याने टोमॅटोचे पिक घेतले जाते. ग्रामस्थांनी अथक परिश्रमातून निर्माण केलेला निसर्ग मन मोहून टाकतो.

गावापर्यंत दळणवळणची व्यवस्था असून नागमोडी वळणे घेत गावात प्रवेश करताच डोंगर पायथ्याशी उंचवटयावरील आपलं पाणी प्रकल्पातून उभी असलली पिण्याच्या पाण्याची टाकी लक्ष वेधून घेते. गावात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची टुमदार शाखा, सार्वजनिक व खाजगी दूरभाष सुविधा, अंगणवाडी, प्राथमिक व माध्यमिक शाळा, सार्वजनिक वाचनालय,उपकेंद्र घारगांव अंतर्गत आरोग्य सेवा सुविधा उपलब्ध आहेत. लोकसहभागातून ग्रामपंचायत, ग्राम पाणी पुरवठा व स्वच्छता समिती तसेच शासकीय निमशासकीय कर्मचारी यांचे अथक प्रयत्नातून हागणदारी मुक्त गांव बोरबनचा आदर्श घेऊन गांव हागणदारीमुक्ती कडे वाटचाल करीत आहे. गावात एकूण ३० टक्के पेक्षा जास्त आदिवासी समाज आहे. गावाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून आपलं पाणी प्रकल्पांतर्गत गाव कृती आराखडा तयार करणेत आला होता. त्याअनुषंगाने विकास कामे प्रगतीपथावर आहेत. मुळा नदीवर उदभव विहीरीचे पाणी शाश्वत राहणे करीता तसेच जलसंधारणाकरीता रु.४७ लक्ष खर्चाचा

**मोजे् कोठे बु. येथील योजनेच्या कामाचे भुमीपूजन करताना श्रीमती प्राजक्ता लंवगारे मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अहमदनगर**





**मोजे् कोठे बु. येथील विहीरीच्या कामाची पाहणी करताना श्रीमती प्राजक्ता लंवगारे मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.अहमदनगर**

कोल्हापूर पध्दतीचा बंधारा बांधण्यात आला आहे.

गावात एकूण ८ बचत गट कार्यरत आहेत. त्यापैकी वैभव लक्ष्मी महिला बचत गट मेणबत्ती उत्पादन व्यवसाय करीत आहे. गावातील ग्रामस्थांची क्षमता बांधणी चांगल्या प्रकारे झाल्याने गांवातील स्थानिक संस्थांच्या निवडणूका बिनविरोध होतात. आपलं पाणी प्रकल्पांतर्गत रु.३३.८० लक्ष खर्चाच्या नळ पाणी पुरवठा योजनेचे काम सर्व उपांगनिहाय (उदभव विहीर, उर्ध्वदाब नलिका, पंपीग मशिनरी, पंप घर, उंच टाकी, वितरण व्यवस्था इ.) पुर्ण झालेले असून ३१ मार्च २००६ रोजी पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत झालेली आहे. या कामी जिल्हा प्रकल्प व्यवस्थापन कक्ष अहमदनगर च्या चमुने अथक परिश्रम घेतलेले आहेत.

सदर योजनेचे काम लोकसहभागातून प्रभावीपणे होण्यासाठी जिल्हा परिषद अहमदनगर च्या तत्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती प्राजक्ता लंवगारे यांनी योजनेस वारंवार भेट देऊन ग्रामस्थांना बहुमुल्य मार्गदर्शन केले. जर्मन शासनाच्या ( के.एफ.डब्ल्यू.) प्रतिनिधीने या गांवास भेट देऊन ग्रामस्थांच कौतूक केले आहे.

सदरची योजना गावातील लोकांच्या सहभागातून पुर्णत्वास नेणे तसेच गाव स्तरावर देखभाल दुरुस्ती साठी योजना स्वावलंबी करणे करीता ग्राम आरोग्य पोषण पाणी पुरवठा व स्वच्छता समिती कोठे बु.चे अध्यक्ष, सर्व समिती सदस्य तसेच समस्त ग्रामस्थ हे या यशोगाथेचे मुख्य शिल्पकार आहेत.



